# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११०१८
# यशवंतराव चव्हाण स्मृति रूग्णालय,
# संत तुकारामनगर, पिंपरी – ४११०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृति रूग्णालयामध्ये कोविड-१९ चे कामकाजाकरीता आय.सी.यु आणि एच.डी.यु विभागात तातडीने खालील तक्त्यात नमुद केलेली पदे कोविड कालावधीकरीता तात्पुरत्या स्वरूपात ६ महिने कालावधीकरीता भरावयाची आहेत . मानधनावर भरावयाची पदे , पदसंख्या, शैक्षणिक अर्हता,आरक्षण व अटीशर्ती इत्यादी तपशील खालीलप्रमाणे –

| अ.क्र | पदनाम | पद संख्या | शैक्षणिक पात्रता | एकुण मानधन | अर्ज स्विकृती/ मुलाखत दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | **इंटेनसिव्हीस्ट** (अ.जा-३,अ.ज-२, विजा-अ-१,भज-ब-१, भज-क-१, इ.मा.व-४, एसईबीसी-४, ईडब्ल्युएस-२, खुला-६) | २४ | मान्यता प्राप्त विद्यापीठाची MD/DNB- MED,ANA, Chest पदवी व एम.एम.सी रजि. अद्यावत. तसेच ICU मधील कामाचा अनुभव. | १२५०००/- | **दि.०३/०८/२० ते दि.०८/०८/२०** |
| | | | मान्यता प्राप्त विद्यापीठाची DA/DTCD पदवी व एम.एम.सी रजि. अद्यावत असणे आवश्यक, तसेच ICU मधील कामाचा अनुभव. | १००००० /- | |
| २ | **वैद्यकिय अधिकारी आय.सी.यु** (अ.जा-१२,अ.ज-७, विजा-अ-३,भज-ब-३, भज-क-३,भज-ड-२, वि.मा.प्र-२, इ.मा.व-१८, एसईबीसी-१२, ईडब्ल्युएस-१०, खुला-२४) | ९६ | एम.बी.बी.एस पदवी उत्तीर्ण (प्राधान्य) एम.एम.सी/एम.सी.आय. रजि. आवश्यक | ७५०००/- | **दि.०३/०८/२० ते दि.०८/०८/२०** |
| | | | बी.ए.एम.एस पदवी उत्तीर्ण व M.C.I.M/C.C.I.M कडील नोंदणी आवश्यक<br>बी.एच.एम.एस पदवी उत्तीर्ण व M.C.H कडील नोंदणी आवश्यक. | ५००००/- | |
| ३ | **कनिष्ठ निवासी दंतरोग** (अ.जा-२,अ.ज-१, विजा-अ-१,इ.मा.व-२, एसईबीसी-२, ईडब्ल्युएस-१, खुला-३) | १२ | बी.डी.एस./ एम.एस.डी.सी. रजि.अद्यावत असणे आवश्यक. | ५००००/- | **दि.०३/०८/२० ते दि.०८/०८/२०** |
| ३ | **जी.एन.एम.स्टाफनर्स स्टाफनर्स** (अ.जा-१७,अ.ज-९, विजा-अ-४,भज-ब-३, भज-क-४,भज-ड-३ विमाप्र-२, इ.मा.व-२४, एसईबीसी-१७, ईडब्ल्युएस-१३, खुला-३२) | १२८ | उच्च माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण, शासन मान्य संस्थेकडील जी.एन.एम/ ए.एन.एम कोर्स/BSC नर्सिंग पुर्ण, महाराष्ट्र नर्सिंग कॉन्सिलकडील रजिस्ट्रेशन आवश्यक . GNM | ३५०००/- | **दि.०३/०८/२० ते दि.०८/०८/२०** |
| | | | ANM | ३००००/- | |

**<u>अटीव शर्ती</u>:-**

१. उपरोक्त जाहिरातीमध्ये नमुद केलेली पदे ही पुर्णपणे कोविड-१९ चे कामकाजाकरीता तात्पुरत्या हंगामी स्वरूपात भरण्यात येणार आहेत. त्यामुळे अर्जदारास कोणत्याही कायमपदी नेमणुकीचा हक्क राहणार नाही. याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

२. ज्या दिवशी मनपास सदर पदाची आवश्यकता नसेल त्यावेळी व विनापरवाना गैरहजर राहिलेस कोणत्याही नोटिशीशिवाय त्यांच्या मानधनावरील सेवा संपुष्टात आणण्यात येतील.

३. लेखी परिक्षेस/ Walk In Interview करीता येण्या-जाण्याकरीता उमेदवारास कोणत्याही प्रकारचा प्रवास भत्ता दिला जाणार नाही.

४. उपरोक्त पदांना विहित केलेनुसार तसेच शैक्षणिक अर्हता व कामाच्या अनुभवानुसार मानधन अदा केले जाईल. अर्जासोबत सादर केलेला अनुभवाचा दाखला खोटा असल्याचे निर्दशनात आलेस तो अनुभव ग्राह्य धरला जाणार नाही.

५. सर्व उमेदवारांनी लेखी परिक्षेसाठी/ मुलाखतीसाठी उपस्थित राहताना शैक्षणिक अर्हता, जातीचे प्रमाणपत्र व अनुभवाबाबतच्या आवश्यक त्या मुळ प्रती व स्वत: च्या स्वाक्षरीने साक्षांकित केलेल्या प्रती उदा. गुणपत्रिका (मार्कशीट) सर्टिफिकेट, फोटो, इ. सादर करणे बंधनकारक आहे.

६. निवड केलेल्या उमेदवारांना म.न.पा.ने ठरवून दिलेल्या अटी शर्तीनुसार कामकाज करणे बंधनकारक राहिल. त्याप्रमाणे काम करणेस नकार दिलेस नेमणुक रद्द करण्यात येईल.

७. सदर पदांना महाराष्ट्र आरक्षण कायदा २००४ नुसार मागासवर्गीयांचे आरक्षण लागू राहील.

८. सदरची पदे आरक्षणानुसार भरण्यात येतील. उपरोक्त आरक्षणानुसार पुरेसे उमेदवार उपलब्ध न झाल्यास अशा वेळेस पदे रिक्त न ठेवता जाहिरातीमधील पदे गुणानुक्रमे यादीतील उमेदवारांना नेमणुका देऊन भरण्यात येतील याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

९. केंद्रशासनाने व पिं.चि.म.न.पा. ने देऊ केलेले विमा योजनेचे संरक्षण लागू करणेत येईल.

१०. निवड झालेल्या उमेदवारांसाठी नियमाप्रमाणे विलगीकरणाची रजा दिली जाईल.

११. तसेच कोविड सेवा कालावधी दरम्यान व विलगीकरणाच्या दरम्यान राहण्याची व्यवस्था केली जाईल.

**<u>मुख्य अटी खालील प्रमाणे राहतील-</u>**

- उमेदवारांना रूग्णालयीन कामकाजाच्या वेळा पाळणे बंधनकारक राहील. त्यामध्ये कोणतीही सवलत अनुज्ञेय नाही.
- उमेदवारांची नेमणुक झालेनंतर बायोमेट्रीक पध्दतीने हजेरी नोंदविणे बंधनकारक राहील. व हजेरी मस्टरवर रोजचे रोज स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. त्याशिवाय पगार अदा केला जाणार नाही.
- उमेदवारांचे वय ५० वर्षापेक्षा जास्त नसावे. तसेच त्यांना दिर्घ स्वरूपाचा आजार नसावा.

तरी इच्छुक उमेदवारांनी वरील पदांकरिता नावांपुढे दर्शविण्यात आलेल्या दिनांकास यशवंतराव चव्हाण स्मृति रूग्णालयामधील चाणक्य प्रशासकीय कार्यालयाशेजारील हॉलमध्ये दि.०३/०८/२०२० ते दि.०८/०८/२०२० पर्यंत रोज सकाळी -१०.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत विहित नमुन्यातील अर्जासोबत आवश्यक त्या कागदपत्रांच्या मुळ प्रती व साक्षांकित केलेल्या प्रतीसह समक्ष उपस्थित रहावे. तसेच आलेल्या इच्छुक उमेदवारांचे रजिस्ट्रेशन सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० या वेळेत केले जाईल. रजिस्ट्रेशन झालेल्या उमेदवारांना सदर पदासाठी घेतल्या जाणा-या लेखीपरीक्षा /मुलाखतीबाबत समक्ष सुचना दिल्या जातील व त्याबाबतचा तपशील महानगरपालिकेच्या वेबसाईटवर प्रसिध्द केला जाईल. सदर दिवशी आवश्यक तेवढे उमेदवार न मिळाल्यास वरील पदे भरेपर्यंत कोविड कालावधीकरीता Walk In Interview आयोजित केल्या जातील. यासाठी समक्ष पत्रव्यवहार केला जाणार नाही.

सही/-
(श्रावण हर्डीकर)
**आयुक्त**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११०१८.

जाहीरात क्र.- ४२३
रोटेशन क्र.- ब-१
वेबसाईट –www.pcmcindia.gov.in
क्र.वायसीएमएच/७/कावि/ ५९६/२०२०
दिनांक. ३० /०७/२०२०.